# "कोल्हापुरचा गौरव - जयप्रभा स्टूडिओ"

प्रस्तुत,

## विवेकानंद महाविद्यालय, कोल्हापूर (स्वायत्त)

(स्वायत्त) कोल्हापूर

कला पदवीधर तृतीय वर्ष

विषय – इतिहास

तेजस दीपक कुपवाडे.

मार्गदर्शक

डॉ. एस. आर. कट्टीमनी.

इतिहास विभाग प्रमुख,
विवेकानंद महाविद्यालय कोल्हापूर.

२०२२



Scanned with CamScanner

# प्रतिज्ञापत्र

मी, तेजस दीपक कुपवाडे

विवेकानंद महाविद्यालय कोल्हापूर (स्वायत्त) येथे कला शाखा भाग - ३ च्या इतिहास विभागात शिकत असून असे प्रतिज्ञापत्र प्रस्तुत करतो की सत्र - ६ च्या अंतर्गत मुल्यांकनासाठी सादर केलेला प्रकल्प ***कोल्हापूरचा गौरव - जयप्रभा स्टूडिओ***.. हा मी स्वतः क्षेत्रभेट घेवून व इतर उपलब्ध प्राथमिक व दुय्यम साधनांचा आढावा घेवून तयार केला आहे. पूर्वी सदर झालेल्या कोणत्याही प्रकल्प अहवालाची नक्कल करून अथवा इतर कोणाकडूनही लिहून घेवून हा प्रकल्प अहवाल सादर केलेला नाही.

**दिनांक:१९/०५/ २०२२**

**ठिकाण : कोल्हापूर**

**तेजस दीपक कुपवाडे.**

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964



Scanned with CamScanner

# कोल्हापूरचा गौरव......

# जयप्रभा स्टुडिओ

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD
JUNE
1964
(Autonomous)



Scanned with CamScanner

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | प्रस्तावना | ५ |
| २. | उद्दिष्टे | ६ |
| ३. | पूर्व संशोधनाचा आढावा | ७ |
| ४. | संशोधन पद्धती | ८ |
| ५. | गृहितके | ९ |
| ६ | सिनेसृष्टीचे बाबा 'भालजी पेंढारकर.' | १० |
| ७. | कोल्हापूर सिनेटोन | १४ |
| ८. | स्टूडिओवरील आपत्तीग्रस्त प्रसंग | १८ |
| ९. | वर्तमानकाळातील जयप्रभा | २१ |
| १०. | निष्कर्ष | २३ |
| ११. | संदर्भ ग्रंथ | २४ |


VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964



Scanned with CamScanner

# प्रस्तावना

भारतीय चित्रपटसृष्टीच्या इतिहासात जेव्हा आपण डोकावतो, तेव्हा एका सुवर्ण काळाची अनुभूती येते. चित्रपटसृष्टाचा आरंभ हाच महाराष्ट्रातून आणि या मराठी भाषेतून झाला. तसेच भारतीय चित्रपटांविषयी बोलायचे, लिहायचे झाल्यास कोल्हापूराच्या उल्लेखाशिवाय ते पूर्ण होणं अशक्य आहे. कारण या कोल्हापूराचे भारतीय चित्रपटसृष्टीच्या जडणघडणीत फार मोठे योगदान आहे. **कोल्हापूरचे भारतीय सिनेसृष्टीवर ऋण आहे, हे भारताला मानावेच लागेल. बाबूराव पेंटरांची महाराष्ट्र फिल्म कंपनी**, **शांतारामबापूंची प्रभात फिल्म कंपनी** आणि भालजीं चा ऐतिहासिक जयप्रभा स्टूडिओ हे काही विस्मयकारक चित्रपटनिर्मीतीच्या संस्था कोल्हापूरात कार्यरत होत्या. आज हे इतिहासजमा झाले असले, तरी कोल्हापूरातील प्रत्येक कलाकार, कलाप्रेमी व रहिवासींसाठी ही आजही अभिमानाची गोष्ट आहे. त्यापैकीच **चित्रतपस्वी भालजी पेंढारकर** यांची कर्मभूमी असलेल्या जयप्रभा स्टूडिओचा प्रस्तुत लघूप्रकल्पामध्ये अभ्यास केला गेला आहे. जयप्रभा आजही कोल्हापूरकरांसाठी गौरवशाली वास्तू आहे. काही कलाकृती या इतिहासजमा जरी झाल्या तरी पिढ्यानपिढ्या त्या लोकांच्या मनावर ठसा उमटवलेल्या, नेहमीच लक्षात राहण्याजोग्या असतात.

भारतीय चित्रपट दुनियेत ५० ते ९० च्या दशकापर्यंत अनेक असे अजरामर असणार्या कलाकृतींना उजाळा मिळाला. त्यात सदाबहार गीत, संगीत व चित्रपट जे कधीही पाहिलं, ऐकलं तरी जुनं वाटणार नाही, अशी अजरामर कला. अशाच काही मराठीतील सदाबहार, अजरामर चित्रपटांची **साक्ष** म्हणून आज बिकट स्थितीतही जयप्रभा उभा आहे आणि सदैवच राहिल. **कारण इतिहास कधीच संपत नसतो.....**

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)



Scanned with CamScanner

# प्रकल्पाची उद्दिष्टे

१) स्टूडिओचा परिपूर्णरित्या अभ्यास करणे, तसेच गतकाळ व वर्तमानकाळ यांतील तुलना अभ्यासणे.

२) सदर ऐतिहासिक स्थळाच्या जतन व संवर्धनासाठी सुरू असलेल्या चळवळ, आंदोलन मोहिमेला जाहीर पाठिंबा दर्शवणे.

३) जयप्रभामधील दिग्गज कलाकारांसंबंधी माहिती मिळवणे.

४) स्टूडिओ संबंधी सत्यता जाणून घेणे. ऐतिहासिक पार्श्वभूमी अभ्यासणे.

COLLEGE KOLHAPUR
ESTD
JUNE
1964
(Autonomous)



Scanned with CamScanner

# पूर्व संशोधनाचा आढावा...

१) **डॉ. कविता गगराणी**यांच्या कोल्हापूरच्या चित्रपटसृष्टीचा इतिहास यामध्ये चित्रपटांसंदर्भात माहिती सांगितली आहे.

२) **पु. ल. देशपांडे आणि ग. रं. भिडे संपादित कोल्हापूर दर्शन** या मदनमोहन लोहिया यांच्या अभिनंदन ग्रंथात कोल्हापूरातील चित्रपट इतिहासाबद्दल परिपूर्ण माहिती उपलब्ध आहे.

३) प्रभाकर पेंढारकरांच्या **'एका स्टूडिओचे आत्मवृत्त'** या स्टूडिओच्या आत्मचरित्रात हा स्टूडिओ स्वतः बद्दल बोलताना उत्स्फूर्तपणे व्यक्त झाला आहे.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964



Scanned with CamScanner

# संशोधन पद्धती

प्रस्तुत प्रकल्पामध्ये ऐतिहासिक आणि वर्णनात्मक संशोधनपद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. तसेच प्रस्तुत लघू प्रकल्पाशी संबंधित प्राथमिक व दुय्यम साधानांच्या अध्ययनाद्वारे यांचा अभ्यास यातून केला आहे.

प्रस्तुत लघूप्रकल्पाकरिता **'जयप्रभा स्टूडिओ'** या ऐतिहासिक ठिकाणी प्रत्यक्ष भेट त्याची सद्यस्थिती जाणून घेतली. सदर ठिकाणी निरीक्षणाद्वारे प्रकल्पात ऐतिहासिक पद्धतीने मांडणी केली आहे.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964



Scanned with CamScanner

# गृहितके

१) **चित्रतपस्वी** भालजी पेंढारकरांची कर्मभूमी असलेल्या जयप्रभा स्टूडिओच्या इतिहासातील स्थिती आणि सद्यस्थिती यांत खूपच फरक आहे.

२) दुसर्या भाषेत सांगायचं, तर या स्टूडिओने आजवर स्वतःच्या बाबतीत फार शोकांतिका व सुखांतिका अनुभवल्या रआहेत

३) रूपेरी पडद्यावरील इतिहासातील अनेक दिग्गज कलाकारांची कारकीर्द घडताना जयप्रभाने पाहिले आहे.

४) या **कलानगरी** म्हणजेच कोल्हापूरासाठी जयप्रभा स्टूडिओ हा अभिजात महत्त्वाचा आहे.

५) हा केवळ स्टूडिओ नसून कोल्हापूरातील प्रत्येक **कलाप्रेमीं**च्या धमन्यांत भिनलेला एक अभिमान आहे.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)



Scanned with CamScanner



# सिनेसृष्टीचे बाबा 'भालजी पेंढारकर'

भारतीय चित्रपटसृष्टीचा प्रारंभ मराठी मातीतील दादासाहेब फाळकेंनी केला. १९१३



साली मुंबई प्रदर्शित झालेला 'राजा हरिश्चंद्र' हा दादासाहेबांनी बनवलेला देशातील पहिलाच चित्रपट होता. पुढे चित्रपटव्यवसाय कोल्हापूरातही सुरू झाला. राजर्षि शाहूंच्या नगरीत कोल्हापूरच्या रांगड्या मातीत चित्रनिर्मितीसाठी **बाबूराव कृष्णराव मेस्त्री उर्फ बाबूराव पेंटर** यांनी पुढाकार घेतला. स्वत: च्या कार्यातून त्यांनी चित्रीकरणासाठीचा छायाचित्रक (कॅमेरा) बनवला. त्यांनी चित्रपटनिर्मीतीसाठी 'महाराष्ट्र फिल्म कंपनी' ची स्थापना केली. बाबूराव पेंटर हे स्वतः उत्कृष्ठ चित्रकार पण होते. महाराष्ट्र फिल्म कंपनीचा **'सैरंध्री'** हा चित्रपट अतिशय लोकप्रिय ठरलेला होता. शिवाय हा हिंदुस्थानातील दुसरा लोकप्रिय चित्रपट होता. दादासाहेबांनी मुंबईत या चित्रपटसृष्टी व व्यवसायाची सुरूवात केली, पण याचा विस्तार आणि एकूणच या व्यवसायाला सौंदर्याचे लेणे चढवण्याचे कार्य बाबूरावांनी केले. बाबूराव पेंटर व बाळासाहेब यादव हे दिग्गज कोल्हापूरच्या क्षेत्रातच चित्रपटांचं नवविश्व निर्माण करण्यात व्यस्त झाले. त्यांनंतर पडद्यावर केवळ हालचाल करणारी **मुकचित्रे** आता बोलू लागली होती.



शांतारामबापू



VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with CamScanner



कारण १९३२ साली हिंदुस्थानात बोलपटांची सुरूवात झाली होती. **शांताराम राजाराम वणकुद्रे** म्हणजेच **व्ही. शांताराम.** शांतारामबापू आधी **महाराष्ट्र फिल्म कंपनी**तच कार्यरत होते. परंतु पुढे त्यांनी स्वतंत्र होऊन कोल्हापूरात **प्रभात फिल्म कंपनी**ची निर्मीती केली. या प्रभातने बोलपटनिर्मितीवर भर दिला. सार्या हिंदुस्थानात प्रभातचा प्रकाश झळकत होता. परंतू अचानक प्रभात कंपनी पुण्याला हालवण्याचे ठरले. प्रभातच्या, अचानक निर्णयामुळे कोल्हापूरकरांत सायंकाळ निर्माण झाली होती. त्यानंतर कोल्हापूरात चित्रनिर्मीतीची संस्था बनावण्याचा विचार सुरू होता. कोल्हापूरचे त्याकाळचे मेजर **दादासाहेब निंबाळकर** यांनी **राजर्षि शाहूपुत्र छत्रपती राजाराम** महाराजांकडे हा विचार मांडला. महाराजांना ही गोष्ट पटली. राजाराम महाराजांच्या बेलबागेतील जागेत स्टूडिओ उभारायचं ठरलं व ही जबाबदारी मेजर दादासाहेबांकडे सोपविण्यात आली. स्टूडिओसाठी लागणार्या तांत्रिक सुविधा, कलाकारांचा शोध घेण्याची धडपड यासाठी एखाद्या महत्त्वपूर्ण, उत्तम दर्जाची व्यक्ति आवश्यक होती. पुण्यात सरस्वती सिनेटोनमध्ये काम करत असलेला एक युवक मेजर दादासाहेबांच्या नजरेस आला. हा कोल्हापूरातील मंगळवार पेठेतच राहणारा होता. प्रायव्हेट स्कूलचा विद्यार्थी, अतिशय हुशार, पण अभ्यासात ह्याचे बिल्कुल ध्यान लागत नसे. तो तरूण दहावीच्या माध्यमिक परिक्षेत अनुतीर्ण झाल्याने त्याची आई त्याच्यावर खूप रागावली, तसा यालाही राग आला म्हणून तो घर सोडून पुण्याला निघून गेला. त्याच्या आईला काळजी वाटू लागली. शिक्षण नसलेला, कामाचं काहीच अनुभव नसलेला हा पुण्यात राहणार तरी कसं? दोन वेळच्या भाकरीपुरते तरी पैसे याला मिळवता येतील का? चार दिवस उपासमाराने घरची आठवण येईल आणि हा परत येईल, असं त्यांच्या आईंना वाटलं. पण हा तरूण काय परतला नाही. पुण्यातच राहिला. केसरी दैनिकाचे अंक टाकण्याचं कार्य करू लागला. ज्यातून केवळ दहा पैसे त्याला मिळायचे. तेवढ्यांतून उदरनिर्वाह होत नसल्याने, तो इतर कामेही करू लागला आणि त्यातूनच एक दिवस त्याला चित्रपटांच्या जाहिरातींचं काम मिळालं. यातून नवी कला त्यास



EKANAND COLLEGE KOLHA
ESTD
JUNE

Scanned with CamScanner

परिचीत झाली. नाट्यकलेचं तर त्याला प्रचंड वेड. शालेय जीवनांत हा तरूण मेळे लिहून मुलांना बसवून देई. पुढे हा नाटकाच्या तालमी घेऊ लागला. त्यानंतर पुढे त्याला चित्रपटांची पटकथा लिहिण्याची संधी मिळाली. त्या तरूणाचं नाव होतं **भालजी पेंढारकर.** कलानगरीत चित्रपट व्यवसायाशी निगडीत बरेच महान व्यक्ती होऊन गेले ज्यांनी रसिकजनांवर आपल्या चित्रपटांची छाप सोडली आणि मानाचे स्थान भूषविले. त्या व्यक्तींपैकीच एक असे व्यक्ती होते, की ज्यांच्याशिवाय भारतीय चित्रपटांचा इतिहास अधुराच राहिल. ते म्हणजे **शिवभक्त भालचंद्र गोपाळराव पेंढारकर उर्फ भालजी पेंढारकर(बाबा).** भालजींना लोक व कलाकार टोपणनावाने, मायेने व आदराने **बाबा** म्हणत. तसे सिनसृष्टीचे बाबा होतेच. मराठी चित्रपटसृष्टीतील सन्मानाची पाने म्हणजे भालजी पेंढारकरांचे अद्वितीय, आशयघन चित्रपट. **" बहु असोत सुंदर, संपन्न की महान, प्रिय आमुचा एक महाराष्ट्र देश हा..."** हे **'श्रीपाद कृष्ण कोल्हटकर'** लिखीत भालजी पेंढारकरांच्या चित्रपटांचे स्फूर्तीदायी शीर्षकगीत असे.

भालजी मूळचे कोल्हापूरचेच. **२ मे १८९०** सालचा त्यांचा जन्म. कोल्हापूर दरबारातील सहायक **गोपाळराव पेंढारकर** व त्यांच्या पत्नी **राधाबाई** यांचे मधले धाकटे सुपुत्र म्हणजे भालजी. **बाबूराव पेंढारकर** हे भालजींचे थोरले, तर **मास्टर विनायक** हे धाकटे बंधू होते. भालजींची मावशी कमाळाबाई व त्यांचे पती **राजारामबापू वणकुद्रे** यांची अपत्ये म्हणजेच शांताराम, अवधूत व केशवराम होय. **व्ही. शांताराम व भालजी हे मावसबंधू होत.** मग पटकथा लिहिण्याची संधी मिळाल्यावर भालजींनी पुढे श्यामसुंदर नावाच्या चित्रपटाची पटकथा लिहिली व दिग्दर्शनही केले. त्यांना लेखनाची सवय झाली असली तरी तसा त्यांचा हा पहिलाच प्रयत्न, आणि ह्या प्रयासाने तर यशाचे शिखरच गाठले. **हिंदुस्थानात पहिल्यांदा रौप्यमहोत्सव** साजरा करण्यात आलेला






VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD
JUNE
1964
(Autonomous)

**'श्यामसुंदर'** हा चित्रपट ठरला. भालजींना कोल्हापूर संस्थानानं स्टूडिओच्या कार्यासाठी तज्ज्ञ म्हणून  सन्मानाचं निमंत्रण आलं. त्यांनी ते स्विकारलं. त्यानंतर त्या स्टूडिओ कार्यास वेग आला. भालजी सांगतील तसं सगळं होऊ लागलं. भालजींच्या म्हणण्याप्रमाणे स्टूडिओची योग्य ती उभारणी करण्यात आली. ज्याला **'कोल्हापूर सिनेटोन'** असं नाव देण्यात आलं.



***मेजर दादासाहेब निंबाळकर कोल्हापूर सिनेटोनचे सर्वेसर्वा***

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)



Scanned with CamScanner

# 'कोल्हापूर सिनेटोन'

ही कलाकारांच्या वेशभूषेची जागा, या रंगपटाच्या खोल्या. हे कार्यलयाचे कक्ष, तर इथं संगीत वादकांची जागा. एकेका विभागाकरिता खोल्या बांधल्या गेल्या. त्यासाठी विदेशातून यंत्रसामग्री आणली होती. कोल्हापूर सिनेटोनमध्ये उंच अशी एक वास्तू बांधली जात होती. ज्यात खोली नाही काहीच नाही, तर केवळ भिंतीच होत्या. एके दिवशी छत्रपती राजाराम महाराज स्वतः ही वास्तू पाहायला आले होते. ते या मोठ्या रिकाम्या इमारतीला पाहून गोंधळून गेले. येथे ना दारं आहेत, ना उजेड, हव्याची सोय. हा काय तुरूंग बनवला जातोय का? यावर भालजी म्हणाले की, "होय हा तुरूंगच बनतोय. यामध्ये राजे, महाराज, त्यांचे सरदार, दरबारी मंडळींना ठेवायचे आहे." "कोण? कोणते राजे आणि कोणते सरदार?" महाराजांनी विचारलं.

महाराज कंसाची बहिण देवकी आणि पती वासूदेव यांना येथे ठेवायचे आहे, तसेच महाभारत चित्रपट कथेतील अनेक लोकांसाठी इथं जागा करायची आहे असे भालजी म्हणताच, महाराज व सरदार, मंडळी हसू लागले. त्यावेळी या स्टूडिओमधील पहिला चित्रपट **'आकाशवाणी'** चित्रीत होत होता. या चित्रपटाचे लेखन, व दिग्दर्शन स्वतः भालजींनी केलेलं होतं, तर **संगीत गुंडोपंत वालावलकरांचं** होतं.

**'आकाशवाणी'** चित्रपट बनण्यापूर्वी या स्टूडिओला बनून नुकतेच एक वर्ष पूर्ण झालं होतं. त्याकाळी कोल्हापूरात वीजही नव्हती. तरीही इतर स्टूडिओतील काही कल्पक लोकांना नवनव्या कल्पना सुचवत. स्टूडिओतील चित्रीकरणासाठी मोठमोठे आरसे आणले जायचे आणि त्यावरून सुर्यप्रकाश स्टूडिओतील चांदीचे कागद चिकटवलेल्या परावर्तकावर

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964



Scanned with CamScanner

केशवरावजी भोसले



गानमहर्षी अल्लादियाँ खाँ



टाकायचा. त्या प्रकाशात स्टूडिओत चित्रीकरण होत असे. रात्रीच्या वेळी मात्र चित्रीकरणाची वेगळीच कसरत. दिवाळीत लहान मुले जसे **भुईनाळे** उडवत, तसे भुईनाळे स्टूडिओच्या एका कोपर्यात लाऊन ते दृश्य चित्रीत केले जाई. या नगरीत केवळ ऐतिहासिक महत्त्व नव्हते, तर येथे **केशवरावजी भोसलें** सारखे नटश्रेष्ठ होते, **गोविंदराव टेंबे**होते, **गानमहर्षी अल्लादियाँ खाँसारखे** उत्कृष्ठ कलावंत होते. त्यांचा आवाज फिल्मवर येऊ लागला, तेव्हा **'कोल्हापूर सिनेटोन'** अस्तित्वात आला. टाऊन हॉलकडून नव्या राजवाड्याकडे जाणारा रस्ता तिथं काही थोड्या वर्षांनी पंचगंगेकाठी एका खासगी कंपनीनं वीजनिर्माण सुरू केलं. या नगरीला नाटकाचा प्रचंड प्रमाणात शौक होता. येथील पॅलेस नाट्यगृह अलिशान होतं. प्रेक्षकांनी हे नाट्यगृह भरून जाई. परंतू त्याकाळी लोक आता चित्रपटांकडे आकृष्ट होऊ लागल्याने अरूण चित्रपटगृह आणि भाऊसिंगजी पथावरील अमेरिकन इंडिया चित्रपटगृहात ते येऊ लागले. त्यावेळी ध्वनी देखील नव्हता. त्यामुळे येथील चित्रपटगृहात एक तबला वादक डग्गा आणि दुसरा एकजण बाजा (ऑर्गन) घेऊन साथ करायला चित्रपटगृहात बसत. मोठमोठ्या लढाई व कुरूक्षेत्रावरील महायुद्ध यासारखी दृश्याकरीता दोन वाद्ये रणकल्लोळ करीत. पण बदलत्या काळानुरूप **ध्वनी** आला. पडद्यावरील माणसं आवाजात बोलू लागली आणि स्टूडिओत **आकाशवाणी**चा आवाज घुमला. काळ किती झपाट्यानं बदलत असतो. स्टूडिओतील यंत्रसामग्री बदलली नवी माणसं येऊ लागली. ज्या महाराजांनी स्टूडिओ उभारणीची जबाबदारी घेतली होती, ते त्यांच्या राजसंस्थेचेही विलीनीकरण झाले. या स्टूडिओचे नावही आता बदलून जयप्रभा स्टूडिओ केले गेले. हे नाव बाबा म्हणजेच भालजी पेंढारकरांनी आपले थोरले पुत्र त्यागराज उर्फ **'जयसिंग'** मधील **'जय'** आणि धाकटे पुत्र **'प्रभाकर'** मधील **'प्रभा'** अशा प्रकारे नामांतर केले होते. स्टूडिओत चित्रपटासाठी आवश्यक असे विविध विभाग होते. सुरूवातीला



गोविंदराव टेंबे



ESTD JUNE 1964

Scanned with CamScanner

जयशंकर दानवे



दिग्दर्शन विभाग. ज्याचे प्रमुख होते, जयशंकर दानवे. हे म्हणजे अभिजात कलाकार आणि जातीवंत खलनायक. बाबांच्या चित्रपटातील अनेक नकारात्मक भूमिका यांनी अविस्मरणीयरित्या साकारल्या आहेत. पुढचा विभाग येतो, तो म्हणजे **छायाचित्रण विभाग.** या विभागात आधी साजू नाईक प्रमुख होते पण ते मुंबईला गेल्यावर गणपत शिंदे प्रमुख बनले. पडद्यावरील लावलेलं नकली प्रतिमांना खरोखरचीच खोली आहे, असं भासणारी प्रकाशयोजना होती गणपतरावांची. **डेब्री** आणि **अमेरिकन मिचेल** अशा दोन प्रकारचे **छायाचित्रक (कॅमेरे)** त्याकाळी वापरात होते. डेब्री कॅमेरा जरा वजनदार असे. त्या हलवायला किमान दोन माणसं लागतील असा तो काळ्या पेटीसारखा. यात व्ह्यू फाईंडरची सोय अजिबात नसते. त्यामुळे समोरील दृश्य चित्रीत होताना जसं फिल्मवर दिसंल तसंच फिल्ममधून तुम्हाला पाहावं लागेल. त्यामुळे समोरच्या कलाकाराबरोबर कॅमेरा हलवायचा असेल तर, छायाचित्रकाराची परिक्षाच. याउलट अमेरिकन मिचेल कॅमेरात समोरील दृश्य स्पष्ट दिसण्यासाठी एक **व्ह्यू फाईंडर** असतो. ह्यामुळे काम सोपे होते. पण स्टूडिओत मात्र तेव्हा अजूनही **फ्रान्सच्या डेब्री कॅमेरा**चाच वापर होत असे. कारण यात फिल्म चालू झाली की तिचा आवाज बाहेर अजिबात ऐकू येत नाही. भालजींच्या चित्रपटांत सवादांना महत्त्व. त्यात कॅमेराच्या आवाजा व्यत्यय होऊ नये म्हणून जग बदलल तरी भालज डेब्री कॅमेराच वापरत. पुढे येतो **ध्वनीमुद्रण विभाग.** याचे होते चितामणराव मोडक. हे म्हणजे भालजींच्या **'श्यामसुंदर'** या चित्रपटांत श्रीकृष्णाची भूमिका करणार्या **'शाहू मोडकाचे'** ते काका. सगळे त्यांना चिऊकाका म्हणत. पूर्वी गायकाने गायचं आणि नटाने केवळ ओठ हालवायचे, म्हणजेच पार्श्वगायनाची सोय नव्हती. चित्रपटातील नट स्वतः गायक असावा लागे. त्याला उसना आवाज घेता येत नसे. मग स्टूडिओतच सगळे संगीत वादक वाद्यांसह सज्ज होत. संगीत दिग्दर्शकांसमोर उभा

फ्रान्सचा डेब्री कॅमेरा





VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964

Scanned with CamScanner

कलाकार कॅमेरासमोर! चिऊकाकांचा मायक्रोफोन कलाकाराच्या बरोबर हलवावा लागे. त्यात गायकाचा आवाज आणि एकाच जागी बसलेल्या संगीतकारांचे संगीत एकाच वेळी बरोबर टिपायला हवे अशी कसरत सुरू होती १९३८ सालापर्यंत... पुढे **१९३९** साली **पार्श्वगायनाची** सोय आली.

स्टूडिओतील भितींवर सुभाषितांसारखी वाक्ये लिहिलेली आहेत. या स्टूडिओची सुरूवात सकाळी प्रार्थनेनं आणि ध्वजारोहणाने होत असे. ठीक सकाळी ९ वाजता कामगार मंडळी मधल्या चौकात जमत असत. ध्वजारोहणानंतर प्रार्थना होत असे. याचे कारण म्हणजे सर्वांना वेळेवर येण्याची सवय लागावी म्हणून.

**कृषिवलांची वीरवरांची देवांची जननी**

**पतिव्रतांची सद्धर्माची महत् जन्मभूमी |**

**पावित्र्याचे मांगल्याचे अधिष्ठान साजिरे**

**चारित्र्याच्या सिंहासनी ते रूप दिसे गोजिरे |**





VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

Scanned with CamScanner

# स्टूडिओवरील 'सुखद' व 'आपत्तीग्रस्त प्रसंग'

कोणी बाहेरील व्यक्ती येऊन जर जयप्रभाला भेट दिली, तर नक्कीच ही एक शाळा किंवा आश्रम असल्यासारखे त्यांना वाटेल. तसं हे **सिनेचित्रगृह** इतर स्टूडिओपेक्षा वेगळे होते. **१९४२ ते १९४७** हा पाच वर्षाचा काल ह्या वास्तूच्या दृष्टीने सुवर्णयुगाचा होता. त्यावेळी इथं कशीचीच कमी नव्हती. परदेशातून मागावलेली अद्ययावत यंत्रसामग्री, ३०० कर्मचारींचा गट व छोटीशी रसायनशाळा असा वैभवाचा काळ होता. पण कुणाची तरी वाईट नजर लागली, आणि १९४८ च्या महात्मा गांधींवधाच्या लोकक्षोभात ही वास्तू, सर्व वस्तू आणि तीन तयार चित्रपट यांच्यासह जळून भस्म झाली. परंतू खंबीर मनाच्या भालजींनी पुन्हा नव्याने स्टूडिओची उभारणी केली व तिसर्यांदा बारसे केले. अनेक कलावंत कलाकारांना घडताना जयप्रभाने पाहिले आहे. इथल्या कलाकरांप्रमाणेच हिंदुस्थानभर आपल्या अभिनयाची दरारा ठेवणारे परभाषी कलाकरांनाही नव्या कलकारांसारखे कष्ट घेताना जयप्रभाने पाहिलंय. बाबूराव पेंढारकरांसारखे **नटश्रेष्ठ**ही येथील तालमींना हजर असत. बाबूरावांपेक्षा वयाने लहान असलेले भालजी खुर्चीवर बसून तालमी घ्यायचे. भालजींचे समाधान होईपर्यंत ते सांगतिल तसे अभिनय करताना बाबूराव पेंढारकरांना जयप्रभाने जसे पाहिलंय तसेच अभिजात नट-दिग्दर्शक असणार्या **राजा परांजपेंना** पाचवा सहायक दिग्दर्शक म्हणून संहिता हातात धरून बाबांच्या मागे मागे फिरतानाही जयप्रभाने



नटश्रेष्ठ बाबूराव पेंढारकर

राजा परांजपें





VIVEKANAND COLLEGE K... ESTD JUNE 1964 (Autonomous)

Scanned with CamScanner







पाहिलंय. इतकेच काय, तर **'इंडियन डग्लस'** म्हणविणार्या **मास्टर विठ्ठलांना** मोठा अभिनेता झाल्यावरही बाबा सांगताच कोणतीही रंगभूषा करून समूह दृश्यात उभे राहतानाही जयप्रभाने पाहिलंय. त्याकाळी लाहोरपासून मद्रासपर्यंत ज्यांची किर्ती दुमदुमत होती, जे पृथ्वी थिएटर्सचे **अनभिषिक्त सम्राट** होते, ते **'पृथ्वीराज कपूर'** महारथी कर्ण, वाल्मिकी चित्रपटांच्या वेळी जयप्रभामध्ये आले होते. सतत बाबांच्या हाताला लटकलेल्या आणि त्याच्यासोबत सतत स्टूडिओतून हिडताना ८ - ९ वर्षाच्या गोंडस **शशी कपूर**ला जसं जयप्रभाने बघितलंय तसं **'राज कपूर'** ला ही चित्रपटसृष्टीचा श्रीगणेशा गिरवताना भालजींच्या **'वाल्मिकी'** चित्रपटांत चक्क **नारदाच्या** भूमिकेत जयप्रभानं पाहिलंय. जे भालजींना बाबांच्या रूपातील देव मानायचे, ज्यांचे **पिता - पुत्रासारखे** घनिष्ट नाते होते आणि आपल्या कारकिर्दीत महाराष्ट्राला ज्यांनी



खळखळून हासवून सोडलं अशा दादांच्या म्हणजेच **दादा कोंडकें**ना बाबांच्या मार्गदर्शनाखाली पहिले सलग नऊ रौप्यमहोत्सवी चित्रपट बनवातानाही जयप्रभानं पाहिलंय. प्रत्येक मानवाच्या आयुष्यात मानसिक खंबीरता, धैर्य देणारं व मनोबल उंचावणारं असं कोणीतरी असावं, तसे **दादा कोंडकेंच्या आयुष्यात भालजी पेंढारकर होते.** दादांच्या इतक्या अफाट यशामागे भालजी पेंढारकरांचा मोठा वाटा आहे. कधी या स्टूडिओत अशा मनाला यातना देणार्या घटना घडल्या. बाबांकडे जर का कोणी मदत मागण्यासाठी आले तर, खिशातून बाहेर काढलेली नोट ही रूपयाची आहे, शंभर रूपयाची हे न बघताच, ते देत असत. तसेच उजव्या हाताने केलेले काम डाव्या हाताला कळू देत नसत. अशा याच



VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)

Scanned with CamScanner

बाबांच्या बरोबर चाळीस - चाळीस वर्ष काम करणार्या कामगारांनी बोनस प्रकरणामुळे संप पुकारला. इतकेच करून ते थांबले नाहीत, तर बाबा स्टूडिओत आहेत हे माहिती असूनही त्यांच्या नावाने 'भालजी पेंढारकर' मुर्दाबाद अशी घोषणेबाजी सुरू केली. त्यात जर का भालजींच्या घरची मंडळी कोण आली, तर यांना अधिकच जोर येई. हे इतक्यातच नाही थांबले, तर महालक्ष्मी मंदिराच्या महाद्वार रस्त्यावर या घोषणा ठळक अक्षरात लिहून त्या देवीला आणि गावातील सर्वांना वाचायला लावल्या. कधी एकेकाळी अडचण आल्यामुळे बाबांनी लताबाई कडून रूपये पासष्ट हजारांची मदत मागितली होती. पण त्या पैसे पुन्हा न देता, बाबांनी ११ एकर स्टूडिओ आणि जमीन लताच्या ताब्यात दिली होती. लताला परतफेडीचे पैसे केवळ भालजींकडूनच हवे होते. इतर कोणाकडूनच नको होते. भालजींना पैसे देणं शेवटपर्यंच नाही शक्य झालं आणि लताबाईंनी ही सगळी संपत्ती आपल्या ताब्यात घेतली. शेवटीचे स्टूडिओसाठी बाबांनी अनेक प्रयत्न केले, परंतू अखेरच्या श्वासापर्यंत स्टूडिओ नाही परत मिळाला त्यांना. ज्या माणसानं एवढं मोठं वैभव उभं केलं, ज्याला कोल्हापूरची अस्मिता बनवली, त्यालाच ते नाही मिळू शकलं. दादा कोंडकेंना नेहमीच या गोष्टीची खंत वाटत राहिली.

VIVEKANAND COLLEGE
ESTD
JUNE
1964
(Autonomous)



*'श्यामसुंदर'*

*देशातील रौप्यमहोत्सव साजरा करणारा पहिला चित्रपट.*



Scanned with CamScanner




# वर्तमानकाळातील जयप्रभा

जयप्रभा जसा लताबाईंनी आपल्या ताब्यात घेतला, तसे या **अकरा एकर** जमिनीचे त्यांनी तुकडे करून लोकांना विकायला सुरूवात केली. कोल्हापूरकरांना याची किंचीतही खबर लागू दिली नाही. जेव्हा केव्हा स्टूडिओची जमिन विक्री होत असे तेव्हा, प्रत्येक वेळी, कोल्हापूरातील समस्त कलाप्रेमी आणि अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाच्या सदस्यांनी आंदोलनास पुढाकार घेतला. आज जयप्रभाच्या एकूण ११ एकर जागेपैकी स्टूडिओचा भाग म्हणून केवळ तीन एकर जागा शिल्लक आहे. बाकीच्या जागेत टोलेजंग इमारती उभे राहू लागल्यावर कोल्हापूरच्या समस्त कलाकार व कलाप्रेमींनी पुन्हा आंदोलन केले असता लताबाईंनी त्याकडे दुर्लक्ष केले. हे प्रकरण न्यायालयापर्यंत जाऊन



पोहोचले असता न्यायालयाने जैसे थे असा आदेश दिला. अलिकडे नुकतेच फेब्रुवारी महिन्यात **लतादिदिंचे** निधन झालं. पुन्हा जयप्रभा स्टूडिओचा मुद्दा नव्याने उदयास आला. **'जयप्रभा बचाव'** मोहिमेला पुन्हा सुरूवात झाली. **अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाचे सदस्य** व कलाकारांनी साखळी उपोषणाला सुरूवात केली. या मोहिमेला विविध कलाकार, तंत्रज्ञांनी पाठिंबा दिला. तसेच अलिकडेच गाजलेल्या **'पावनखिंड'** या चित्रपटाच्या समस्त **कलाकार वृंद**देखील या मोहिमेस जाहिर पाठिंबा दर्शवला. तरीही हे आंदोलन सुरूच राहिले. आम्ही पुन्हा एकदा जेव्हा भेट देण्यासाठी गेलो, अजूनही साखळी उपोषण सुरूच होते. आज नव्वद दिवस झाले तरी हे आंदोलन सुरूच आहे. राज्य तसेच जिल्हा शासनाने याकडे ढूंकूनही लक्ष दिलं नाही. या स्टूडिओचा कोणताही व्यावसायिक व

ANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964



Scanned with CamScanner

वाणिज्य वापर न होता, एक ऐतिहासिक वास्तू व कलेचा वारसा म्हणून याचे **जतन व संवर्धन** करणं आवश्यक आहे. कारण **जयप्रभा कोल्हापूरचा गौरवशाली इतिहास** आहे.



VIVEKANAND COLLEGE ESTD JUNE 1964 (Autonomous)



Scanned with CamScanner

# निष्कर्ष

१) स्टूडिओचा एकूणपैकी काहीच भाग शिल्लक आहे. पण तो ऐतिहासिक वास्तू म्हणून जतन करण्यायोग्य आहे.

२) सध्या हा स्टूडिओ संकटात आहे, तो बचावलाच पाहिजे यासाठी मोहिम सुरू आहे.

३) एक **इतिहासप्रेमी, इतिहास जाणणारा एक कलाकार** म्हणून जेव्हा जयप्रभाला भेट देतो, तेव्हा कमानीवरील अक्षरे वाचून पहिला ज्या व्यक्तीचे स्मरण होते, ते **भालजी पेंढारकर..** मग आठवतो **जयप्रभाचा सुवर्णकाळ.** मनात पुन्हा ती स्फूर्तीची भावना जागृत होते. भालजींच्या चित्रपटाचे शीर्षक गीत जे महाराष्ट्राचं उत्कृष्ठ गौरवगीतही आहे. ते वारंवार पुन्हा पुन्हा ऐकून पाठ जरी झालं तरी श्रवण करावेसे वाटते आणि मग एक अनुभूती येते की.... जयप्रभा हा केवळ स्टूडिओ नाही, तर मराठी चित्रपटांच्या सुवर्णयुगाची साक्ष देणारी वास्तू आहे. भारतीय चित्रपटसृष्टीतील अनेक कलावंत माणसांची कारकीर्द घडताना पाहिलेली एक अद्भुत वास्तू आहे. ही त्या भालजी पेंढारकरासारख्या देवदूत माणसाची ही कर्मभूमी आहे. कसंही असो परंतू झुंजत राहणारा हा **जयप्रभा स्टूडिओ अलौकिक** आहे.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR ESTD JUNE 1964 (Autonomous)



Scanned with CamScanner

# संदर्भ सूची


१) कोल्हापूर दर्शन संपादक - पु. ल. देशपांडे व गरबाज भिडे.

प्रकाशन संस्था - International Publishing House

२) 'एका स्टूडिओचे आत्मवृत्त' (तिसरी आवृत्ती) ------ प्रभाकर पेंढारकर. प्रकाशक - राजेंद्र प्रकाशन.



VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964





Scanned with CamScanner

# प्रमाणपत्र

असे प्रमाणित करण्यात येते की, **विवेकानंद महाविद्यालय कोल्हापूर (स्वायत्त)** येथे **कला शाखा भाग ३** च्या इतिहास विभागात शिकत असलेला विद्यार्थी **तेजस दीपक कुपवाडे, सत्र - ६** च्या अंतर्गत मुल्यांकनासाठी सादर केलेला प्रकल्प ...."**कोल्हापूरचा गौरव - जयप्रभा स्टूडिओ**"...हा या विद्यार्थ्याने स्वतः तयार केलेला असून , आमच्या माहितीप्रमाणे हा प्रकल्प अहवाल यापूर्वी कोणत्याही पदवी अभ्यासक्रमासाठी सादर झालेला नाही. सदर प्रकल्प अहवाल आमच्या मार्गदर्शनाखाली समाधानकारकरीत्या पूर्ण झालेला आहे.

**दिनांक:१९ -०५- २०२२**

**ठिकाण : कोल्हापूर**

**डॉ. एस . आर. कट्टीमनी.**

विभाग प्रमुख,
इतिहास विभाग,
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

**प्रा. नम्रता ढाळे.**

**प्रा.अश्विनी खवळे.**

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Autonomous) ESTD JUNE 1964



Scanned with CamScanner

# धन्यवाद.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR
ESTD
JUNE
1964
(Autonomous)



Scanned with CamScanner